# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./9209 /२०१८ दि.19/०४/२०१८

# परिपत्रक

विषय : "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीकरीता प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणुन घोषित करण्याबाबत-----" याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक

संदर्भ :
१) मा. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. आरटीएस२०१७/प्र.क्र.१६६/१८(र.वका.), दि. २२ जानेवारी २०१८
२) मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/२०१८/आस्था-२, दि. २५/०१/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, दि. २८ एप्रिल २०१५ रोजी लागु करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागु झाल्यानंतर तिन महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक जिल्हयासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणुक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची राज्यात व विशेषत: जिल्हापातळीवर प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने संबधीत सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे संनियत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणुन संदर्भीय शासन परिपत्रकान्वये घोषीत करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीकरीता आपल्यास्तरावर लोकसेवा विहीत कालावधीत पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही घेण्यात यावी.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र - उपरोक्त संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

E:\LATTER\Circular/215

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 761 दि. 9/3/18
आवक क्र. 1459 दि. 12/3/18

" महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत ... " या विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे दि.२२ जानेवारी, २०१८ चे परिपत्रक (संकेतांक क्र.२०१८०१२३१५३७११३७०७)

---

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 1130 दि. 12/3/18
जावक क्र. ........ दि. ........

पृष्ठांकन क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १३/२०१८/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दूरध्वनी क्र.२२८५५७६६,
दिनांक : २५ जानेवारी, २०१८.

प्रति,

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण)/उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

सदर परिपत्रातील सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या /अधिका-यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत.

(शा.भा.पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Estt Sect
9/3/18

C:\Users\shirish pacolya\क्र.CR_१३_२०१८.docx

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः आरटीएस २०१७/प्र.क्र.१६६/१८(र.व का.)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ जानेवारी, २०१८.

**शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. सबब महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची राज्यात व विशेषत: जिल्हापातळीवर प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे संनियत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक, महसूल व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८ / २०१७ / ई-१ अ, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०१२३१५३७११३७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhananjay Manik Kaned

Digitally signed by Dhananjay Manik Kaned
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=e18fb94e20928aa0c627f26f27a422b56941d8107493189c499f0bcb736511ed, cn=Dhananjay Manik Kaned
Date: 2018.01.23 15:42:06 +05'30'

**( ध. मा. कानेड )**
**उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रत,**

१.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
२.सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३.मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),

४.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५.मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती),
६.मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
७.मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,
८.मा.महाअधिवक्ता,महाराष्ट्र राज्य
९.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१०.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती),
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (२ प्रती),
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६.मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१७. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१८.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१९.सर्व मंत्रालयीन विभाग
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व जिल्हाधिकारी,
२२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२४.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५.निवड नस्ती.(कार्यासन-१८)